नि.फौ.के.नं. ०३/२०२१

नि. क्र. ५०

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ०३ चा जबाब**

**नाव** – रमाकांत मारुती जाधव, **वय**– ४४ वर्षे,

**व्यवसाय** – नोकरी, **रा.** चाफवली सरोदेवाडी, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**सरकारतर्फे सरतपास सरकारी वकील श्रीम. ए. व्ही. गुरुपादगोळ यांचेतर्फे –**

०१. माझ्या घरी माझी आई, पत्नी, पुतण्या सागर, त्याची पत्नी, माझी बहीण वेदीका आणि भाऊ शशिकांत आणि त्याची पत्नी हे लोक राहतात. माझ्या मोठ्या बहीणीचे नाव स्वाती राजेंद्र यादव असे. दि. १५/०७/२०२० रोजी ती घरी आली होती. तीच्या शाळेच्या कामानिमित्त काही कागदपत्रे तीला पहायची होती. तीन सर्व कागदपत्रे सुटकेसमध्ये पाहीली. तीने माझी बहीण वेदीका हीच्याकडे माझ्या आईचे दागीने सुटकेसमध्ये ठेवण्यासाठी दिले होते.

०२. त्या दागीन्यांमध्ये ४ तोळ्याचा नेकलेस, ३ तोळ्याचा सोन्याचा गोफ, ३ तोळे वजनाच्या सोन्याच्या अंगठ्या, वाघनख पेंन्डंट, १ तोळ्याची सोन्याची बांगडी हे दागीने होते. ते दागीने तीने आमच्या सर्वाच्या समक्ष सुटकेसमध्ये असल्याचे आईला दाखवले.

०३. दि. ०२/०८/२०२० रोजी आमच्या गावचे पोलीस पाटील विजय चाळके, सरपंच अपर्णा कांबळे आणि प्रकाश चाळके सकाळी ०८.३० च्या सुमारास अमाच्या घरी आले. त्यांनी आम्हाला घरातील लोकांना बाहेर बोलावले. त्यांनी मला सांगीतले की, सागर जाधव यांनी त्यांना फोन केला होता व काही दागीने त्यांना मिळून आल्याचे सांगीतले होते.

०४. सागर जाधव यांनी त्यांना सांगीतले होते की, त्यांच्या रुममध्ये त्यांना एका डबीमध्ये त्यांना दागीने मिळून आले आहेत. त्यावेळी सागर जाधव तीथेच होते. पोलीस पाटलांनी मला ते मिळून आलेले दागीने दाखवले. माझ्या आईने ते दागीने तीचेच असल्याचे मला सांगीतले. त्यावेळी माझी बहीण वेदीका हीला मोठी बहीण स्वाती हीचा फोन आला. तीने विचारले की, घरी पोलीस पाटील आले आहेत काय. त्यावेळी वेदीका हीने स्वाती हीला घरी येऊन काय घडले आहे ते पाहण्यास सांगीतले.

०५. स्वातीने वेदीकाला घरी आल्यानंतर विचारले की, हे दागीने हीथे कसे आले. पोलीस पाटील यांनी स्पष्टीकरण दिले की, हे दागीने सागर जाधव यांच्या रुममध्ये मिळून आले आहेत. स्वातीने पुन्हा तीची सुटकेस पाहीली. तीने पाहीले की, त्या सुटकेसमध्ये सर्व सामान विस्कटलेले होते. कागदपत्रे अस्ताव्यस्थ पडलेली होती. त्या सुटकेसमध्ये स्वातीचे स्वतःचे देखील दागीने होते. तीला सुटकेसमध्ये तीचे स्वतःचे दागीने मिळून आले. माझ्या आईचे वर नमूद केलेले दागीने मिळून आलेले नाहीत. त्यावेळी पोलीस पाटील यांनी सागर जाधव यांना सांगीतले की, हे दागीने तु पोलीस स्टेशनला जमा कर.

०६. त्यावेळी माझी बहीण स्वाती हीला खात्री झाली की, हे दागीने सागर जाधव, सानवी जाधव आणि शशिकांत जाधव यांनी आपापसात संगनमताने चोरलेले आहेत. स्वाती हीने त्यांच्या विरुध्द पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली. आज रोजी सागर आणि शशिकांत जाधव न्यायालयात हजर आहेत. आरोपी क्र.०२ ला पाहील्यास मी ओळखु शकतो.

**सरतपास पुर्ण.**

<u>**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. आर. के. शिंदे यांचेतर्फे**</u>

०७. हे म्हणणे खरे आहे की, मी रत्नागिरी येथे एस.टी. महामंडळात नोकरी करतो. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे मी रत्नागिरीला स्थायिक असतो. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०१/०८/२०२० ते ०५/०८/२०२० रोजी रजेवर होतो. हे म्हणणे खरे आहे की, रजेच्या कालावधीत मी चाफवली येथे होतो. हे म्हणणे खरे आहे की, माझे, माझ्या बहीणी स्वाती आणि वेदीका यांच्याशी संबंध चांगले आहेत.

०८. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत घटनेसंदर्भात माझ व्यक्तीशः पोलीसांकडे जाण्याचा कधी योग आला नाही. माझा कामाचा कालावधी सकाळी ०८.०० ते सायंकाळी ०७.३० पर्यंत असतो. हे म्हणणे खरे नाही की, दि. ११/०८/२०२० रोजी नेहमी प्रमाणे मी माझ्या कर्तव्यावर हजर होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी काही माहीती सांगीतली आणि पोलीसांनी ती लिहीली असे काही घडले नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि. १५/०७/२०२० रोजी मी ड्युटीवर होतो.

०९. माझ्या सरतपासातील मजकुर की, 'तीच्या **शाळेच्या कामानिमित्त** काही कागदपत्रे तीला पहायची होती', हा असा मजकुर मी पोलीसांना टिपण देतेवेळी सांगीतला होता. माझ्या सरतपासातील मजकुर की, 'ते दागीने तीने आमच्या सर्वाच्या समक्ष सुटकेसमध्ये असल्याचे आईला दाखवले', हा असा मजकुर मी पोलीसांना टिपण देतेवेळी सांगीतला होता. हे म्हणणे खरे आहे की, हा असा मजकुर माझ्या टिपणामध्ये नमुद नाही.

१०. माझ्या सरतपासातील मजकुर की, 'पोलीस पाटील यांनी मला सांगीतले की, सागर जाधव यांनी त्यांना फोन केला होता व काही दागीने त्यांना मिळून आल्याचे सांगीतले होते', हा असा मजकुर मी पोलीसांना टिपण देतेवेळी सांगीतला होता. हे म्हणणे खरे आहे की, हा असा मजकुर माझ्या टिपणामध्ये नमुद नाही. तो तसा का नमुद नाही हे मला सांगता येणार नाही.

११. माझ्या सरतपासातील मजकुर की, 'माझ्या आईने ते दागीने तीचेच असल्याचे मला सांगीतले, त्यावेळी माझी बहीण वेदीका हीला मोठी बहीण स्वाती हीचा फोन आला, तीने विचारले की, घरी पोलीस पाटील आले आहेत काय, त्यावेळी वेदीका हीने स्वाती हीला घरी येऊन काय घडले आहे ते पाहण्यास सांगीतले, स्वातीने वेदीकाला घरी आल्यानंतर विचारले की, हे दागीने हीथे कसे आले, पोलीस पाटील यांनी स्पष्टीकरण दिले की, हे दागीने सागर जाधव यांच्या रुममध्ये मिळून आले आहेत, स्वातीने पुन्हा तीची सुटकेस पाहीली. तीने पाहीले की, त्या सुटकेसमध्ये सर्व सामान विस्कटलेले होते, कागदपत्रे अस्ताव्यस्थ पडलेली होती, त्या सुटकेसमध्ये स्वातीचे स्वतःचे देखील दागीने होते, तीला सुटकेसमध्ये तीचे स्वतःचे दागीने मिळून आले, माझ्या आईचे वर नमूद केलेले दागीने मिळून आलेले नाहीत', हा असा मजकुर मी पोलीसांना टिपण देतेवेळी सांगीतला होता. हे म्हणणे खरे आहे की, हा असा मजकुर माझ्या टिपणामध्ये नमुद नाही. तो तसा का नमुद नाही हे मला सांगता येणार नाही.

१२. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या राहत्या घराच्या एका बाजूला लोकवस्ती आहे. आमच्या घराच्या आजूबाजूला साधारण ४० घरांची लोकवस्ती आहे. हे म्हणणे खरे आहे की, स्वाती यादव सरोदेवाडीमध्येच राहते. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या घरी जाण्यासाठी तीच्याच घरासमोरुन जावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, आजुबाजूच्या ४० घरांशी माझे संबंध चांगले आहेत.

१३. हे म्हणणे खरे आहे की, संपुर्ण घराला छप्पर म्हणजे लोखंडी रीपा व त्यावर कवले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सागर जाधव यांच्या रुममध्ये भिंतींपासून वरच्या आड्यापर्यंत अंतर आहे व ती जागा मोकळी आहे. हे म्हणणे खरे आहे की, भिंतींना सिलींग केलेले नाही.

१४. माझ्या वडीलांना आम्ही भावंडे अशी सहा वारस आहेत. हे म्हणणे खरे आहे की, चाफवली येथील घर वडीलोपर्जीत आहे. सन २००८ साली वेदीकाचे लग्न झाले. हे मला माहीती नाही की, लग्नानंतर काही दिवसानंतर ती तीच्या नव-यापासून विभक्त राहत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला समजले होते की, सन २०१९ मध्ये वेदीकाने उकळते पाणी सागर जाधव यांच्या अंगावर फेकत भाजण्याचा प्रयत्न केला होता. हे मला माहीती नाही की, त्यावेळी सागर जाधव याला गंभीर दुखापत झाली होती.

१५. हे म्हणणे खरे नाही की, मी वेदीकाला सागर विरुध्द खोटी तक्रार कर असा सल्ला दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी वेदीकाला सागरचा छळ करण्यामध्ये सहकार्य करायचो. हे म्हणणे खरे नाही की, सागर जाधवने मा. पोलीस अधिक्षक कार्यालय, रत्नागिरी येथे मी वेदीकाला सहकार्य करत असल्याबाबत तक्रारी अर्ज देत माझ्या विरुध्द, स्वाती विरुध्द आणि वेदीका विरुध्द तक्रार केली होती. हे म्हणणे खरे नाही की, या संदर्भात् मला पोलीस अधिक्षक कार्यालय, रत्नागिरी येथे बोलावण्यात आले होते.

१६. हे मला माहीती नाही की, सागरच्या वडीलांच्या पश्चात त्याचा आणि त्याच्या बहीणीचा ताबा माझ्या वडीलांनी न्यायालयीन आदेशाने घेतला होता. हे म्हणणे खरे आहे की, सागरचा वडीलोपार्जीत जमिनीमध्ये कायदेशीर हिस्सा आहे.

१७. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस अधिक्षक कार्यालय, रत्नागिरी येथे तक्रारी अर्ज दिल्यानंतर पासून सागर आणि माझ्यात संबंध वाईट झालेले आहेत. हे मला माहीती नाही की, शशिकांत जाधव त्याला अडीअडचणीला मदत करतात. हे मला माहीती नाही की, शशिकांत जाधव लांजा येथे राहतात. हे म्हणणे खरे आहे की, ते एस. टी.महामंडळात नोकरीला आहेत. हे म्हणणे खरे नाही की, ते चाफवलीला त्यांच्या कुटुंबा सोबत राहत नाहीत.

१८. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस पाटलांनी मला सांगीतले की, दि. ०१/०८/२०२० रोजी त्यांना सागर जाधवचा फोन आला व त्याने सांगीतले की, त्याच्या खोलीमध्ये हे दागीने कोणीतरी ठेवले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस पाटलांनी मला सांगीतले की, आदल्या दिवशी सागरने त्यांना फोन केल्याने ते घरी आलेले आहेत.

१९. हे म्हणणे खरे आहे की, हॉलमध्ये सर्वाच्या समक्ष ते दागीने समोर ठेवण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, माझी बहीण स्वाती हीने पोलीस पाटलांसमक्ष बोलून दाखवले की,' आणखी आमचे काही दागीने आहेत. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी सागरला सल्ला दिला की, आणखी काही दागीने असल्यास हे दागीने पोलीस स्टेशनला जमा कर. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस पाटलांच्या सांगण्यावरुन सागरने ते दागीने पोलीस स्टेशनला जमा करण्यासाठी निघुन गेला.

२०. हे म्हणणे खरे आहे की, त्या ठिकाणी सागरची पत्नी देखील उपस्थीत होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या विरुध्द, पत्नी विरुध्द आणि दोन बहीणींविरुध्द याच न्यायालयात सानवी जाधव यांनी तक्रार दाखल केली आहे की, वेदीका यादव हीने, त्याची पत्नी सानवी हीला 'तु वेश्या आहेस, तुला कोणीही दोन तीनशे रुपये दिले तर तु खुश होतेस असे वक्तव्य केले. तसेच मी तीला, 'तुला एवढीच पैशाची गरज असेल तर मी तुला पैसे देतो, तु माझ्या शेजारी झोप' असे वक्तव्य केले.

२१. हे म्हणणे खरे नाही की, सानवी हीने आमच्या विरुध्द अशी तक्रार दाखल केल्याने त्याचा राग येऊन माझी बहीण स्वाती हीने आरोपींविरुध्द खोटी तक्रार दाखल केली. दि. ०२/०८/२०२० रोजी माझ्याकडे स्वतःकडे दुचाकी होती. हे म्हणणे खरे आहे की, साखरपा दुरक्षेत्र किंवा देवरुख पोलीस स्टेशनला येण्यास अर्धा ते पाऊण तासाचा वेळ मला दुचाकीने येण्यास लागेल.

२२. दि. ०२/०८/२०२० रोजी मी पोलीस स्टेशनला गेलो नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०२/०८/२०२० नंतर लगेचच मी स्वतःहुन कधीही पोलीस स्टेशनला जाण्याचा प्रयत्न केला नाही.

२३. हे म्हणणे खरे नाही की, स्वातीने वेदीकाला घरी आल्यानंतर विचारले की, हे दागीने हीथे कसे आले, पोलीस पाटील यांनी स्पष्टीकरण दिले की, हे दागीने सागर जाधव यांच्या रुममध्ये मिळून आले आहेत, स्वातीने पुन्हा तीची सुटकेस पाहीली, तीने पाहीले की, त्या सुटकेसमध्ये सर्व सामान विस्कटलेले होते, कागदपत्रे अस्ताव्यस्थ पडलेली होती, त्या सुटकेसमध्ये स्वातीचे स्वतःचे देखील दागीने होते, तीला सुटकेसमध्ये तीचे स्वतःचे दागीने मिळून आले, माझ्या आईचे वर नमूद केलेले दागीने मिळून आलेले नाहीत, त्यावेळी पोलीस पाटील यांनी सागर जाधव यांना सांगीतले की, हे दागीने तु पोलीस स्टेशनला जमा कर, त्यावेळी माझी बहीण स्वाती हीला खात्री झाली की, हे दागीने सागर जाधव, सानवी जाधव आणि शशिकांत जाधव यांनी आपापसात संगनमताने चोरलेले आहेत, स्वाती हीने त्यांच्या विरुध्द पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली. हे मी खोटे नमुद करत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपसातील मजकुर खोटा आहे व आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2024.11.18 18:02:30 +0530

**(श्रीमती एस.एच.पाटील)**

**दिनांक – १८/११/२०२४** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख.**